**न्यायदंडाधिकारी वर्ग १ देवरुख यांचे न्यायालयात, मुक्काम देवरुख, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.**

**नि.फौ.खटला क्र. ११५/२०२५**

**नि.क्र. ०९**

**दोषारोपपत्र**

**मी, श्रीमती आर. आर. कुलकर्णी, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी देवरुख, याद्वारे तुमच्यावर आरोप निश्चित करीत आहे की,**

**आरोपीचे नाव –** **शंकर अर्जुन साळुंखे उर्फ पाटील,**
**वय** – २३ वर्षे, **व्यवसाय** – शेती,
**राहणार** – गुंडगे, गणपती मंदीर शेजारी,
ता. कर्जत, जि. रायगड,

**यांचेवर खालील प्रमाणे दोषारोप ठेवणेत येतो की,**

तुम्ही या न्यायालयाच्या स्थळसिमेत दिनांक ०८/१०/२०२५ रोजीचे सायंकाळी १९:३० ते दिनांक ०९/१०/२०२५ रोजी सकाळी ०६:०० वाजताच्या दरम्याने मौजे संगमेश्वर, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी, येथील फिर्यादी – राकेश तुकाराम आंबवकर यांचे संगमेश्वर एस.टी.स्टँड जवळील संगमेश्वर ते देवरुख जाणारे रोडवर दत्तकृपा मोबाईल शॉपी खरेदी–विक्रीचे दुकानाचे शटरला लावलेली ०४ कुलुपे लोखंडी गज (कटावणी) ने तोडुन आतमध्ये प्रवेश करुन ०३ मोबाईल व इतर ॲस्केसरीज वस्तु चोरी केली, म्हणून तुम्ही ***भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम ३०५(अ) अन्वये***, माझ्या न्यायिक कार्यक्षेत्रात गुन्हा केला आहे व जो मी दखल घेण्यास पात्र आहे.

शेवटचे असे की, वरील तारखेला, वेळेला आणि ठिकाणी, तुम्ही येथील फिर्यादी – राकेश तुकाराम आंबवकर यांचे संगमेश्वर एस.टी.स्टँड जवळील संगमेश्वर ते देवरुख जाणारे

रोडवर दत्तकृपा मोबाईल शॉपी खरेदी–विक्रीचे दुकानाचे शटरला लावलेली ०४ कुलुपे लोखंडी गज (कटावणी) ने तोडुन आतमध्ये प्रवेश करुन चोरी व दुकानफोडी करण्याच्या हेतुने अनाधिकृतपणे रात्रीच्या वेळी ***(सूर्यास्तानंतर आणि सूर्योदयापूर्वी दरम्यानच्या कालावधीत)*** प्रवेश करुन गृह अतिक्रमण केले, म्हणून तुम्ही ***भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम ३३१(४) अन्वये***, माझ्या न्यायिक कार्यक्षेत्रात गुन्हा केला आहे व जो मी दखल घेण्यास पात्र आहे.

**सदर गुन्हा माझे कार्यक्षेत्रातील असून तुमच्याविरुध्द या न्यायालयात खटला चालविला जाईल.**

(रोहिणी आर. कुलकर्णी)

**दिनांक – ०८/०१/२०२६** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी देवरुख,**

**स्थळः देवरुख** **जि. रत्नागिरी.**

**प्रमाणपत्र**

आरोपीला आरोप पत्रातील मजकूर त्याच्या मातृभाषेत वाचून व समजावून सांगितला.

(रोहिणी आर. कुलकर्णी)

**दिनांक – ०८/०१/२०२६** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी देवरुख,**

**स्थळः देवरुख** **जि. रत्नागिरी.**

- : C E R T I F I C A T E : -

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 08/01/2026 |
| Charge signed by PO. on | :- | 31/01/2026 |
| Charge uploaded on | :- | 31/01/2026 |